# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657 E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, शुक्रवार, दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३५१ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- +वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये


## संपादकीय

# डॉक्टर देव की दूत

उपचाराच्या नावाखाली एका डॉक्टरने नवजात बालिकेची अडीच लाखात विक्री केल्याचे प्रकरण वाचून धक्काच बसला. डॉक्टर देव आहे असे अनेक लोक मानतात आणि ते खरेही आहे. एखाद्याच्या घरी गंभीर आजार असलेला व्यक्ती बरा झाला, तर लोक डॉक्टरांना देवच मानतात. डॉक्टरने उपचारासाठी कितीही शुल्क आकारले, तरी लोक डॉक्टरांसमोर नतमस्तक व्हायला मागेपुढे पहात नाही. देवानेच आपल्या माणसाला वाचविले अशी त्यांच्यात भावना असते. परंतु, एका नवजात बालिकेची विक्री करणाऱ्या डॉक्टरला काय म्हणावे हेच समजत नाही. केवळ पैशासाठी उच्चविद्या विभूषित डॉक्टर आपल्या व्यवसायाला काळीमा फासतात. त्यात सर्वच डॉक्टर तसे नसतात. मात्र, या डॉक्टरांमुळे डॉक्टरी पेशा बदनाम झाला आहे. मुलीची विक्री करून या डॉक्टरला किती रुपये मिळाले असते. तेवढ्याच पैशात त्याने एखाद्या रुग्णावर उपचार केले असते, तर त्याला लाखो रुपये मिळाले असते आणि बदनामी सुद्धा झाली नसती. काही दिवसांपूर्वी चंद्रपूर येथेही असाच प्रकार उघडकीस आला होता. कर्ज चुकविण्यासाठी डॉक्टरने एका शेतकऱ्याची किडनी काढून विकली होती. हे प्रकरण उजेडात संपूर्ण राज्यात एकच खळबळ उडाली होती. किडनी विकण्यासाठी डॉक्टरनेच त्या शेतकऱ्याला प्रोत्साहित केल्याचे तपासात पुढे आले होते. याप्रकरणी डॉक्टरसह अनेकांवर गुन्हे दाखल झाले होते. तपासात पुढे आणखी चार ते पाच शेतकऱ्यांनी देखील आपली किडनी विकून सावकाराचे कर्ज फेडल्याचे उघड झाले. त्यामुळे सावकारांवर देखील गुन्हे दाखल करण्यात आले. डॉक्टर मंडळी असे कृत्य करीत असतील, तर त्यांना देव म्हणावे की, दूत हेच कळत नाही.

# राहुल गांधींना मोठे होण्याची गरज

## हरदीप पुरी यांनी एपस्टीन फाइल्सवर दिले प्रत्युत्तर



**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. १२**

अमेरिकेतील कुख्यात लैंगिक गुन्हेगार जेफ्री एपस्टीनशी संबंधित एपस्टीन फाईल्सचा मुद्दा संसदेत उपस्थित केल्यावरून केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी राहुल गांधींवर जोरदार निशाणा साधला आहे. काँग्रेस नेत्याला आता मोठे होण्याची गरज आहे, अशा शब्दांत पुरी यांनी राहुल गांधींच्या राजकीय परिपक्वतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राहुल गांधींनी लावलेल्या आरोपांबाबत मी स्वतः स्पष्टीकरण दिले होते. लाखो कागदपत्रांपैकी काही ईमेल्समध्ये माझे नाव आले आहे, हे मी आधीच सांगितले होते. जर राहुल गांधींनी ती सविस्तर नोट नीट वाचली असती, तर त्यांनी संसदेत स्वतःचे हसे करून घेतले नसते. राहुल गांधींचा दृष्टिकोन म्हणजे हावभावाचे राजकारण पुरी यांनी राहुल गांधींच्या कार्यपद्धतीवर टीका करताना त्यांच्यातील परिपक्वतेच्या अभावावर बोट ठेवले. ते म्हणाले, हा मुद्दा केवळ एपस्टीनबद्दल नाही, तर विरोधी पक्षनेत्यांच्या अपरिपक्वतेबद्दल आहे. ते केवळ हावभावाच्या राजकारणावर विश्वास ठेवतात. संसदेत एखादा मुद्दा मांडताना तुमचे संशोधन पक्के असायला हवे. राहुल गांधी काहीतरी बोलतात आणि नंतर चर्चा टाळून पळून जातात. संसद हे माहितीपूर्ण चर्चेचे व्यासपीठ आहे, केवळ प्रदर्शनाचे ठिकाण नाही. राहुल गांधींच्या दृष्टिकोनाला हावभावाचे राजकारण असे संबोधून हरदीप पुरी यांनी त्यांच्यावर आरोप केले आणि नंतर आवश्यक वादविवाद टाळल्याचा आरोप केला.

**व्यापार करारावरील टीकेला चोख प्रत्युत्तर**

अमेरिकेसोबतच्या व्यापार करारावर काँग्रेसकडून होणाऱ्या टीकेला उत्तर देताना पुरी म्हणाले की, भारत प्रगती करत आहे याचा काँग्रेस नेत्यांना हेवा वाटतो, कारण त्यांचा जनतेच्या अपेक्षांवर विश्वासच नाही. यावेळी त्यांनी केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांच्या विधानाचा संदर्भ देत पंतप्रधान मोदींवरील आरोपांचा समाचार घेतला. पंतप्रधानांवर शरणागतीचे आरोप करू शकेल असा कोणीही अजून जन्माला आलेला नाही, असेही पुरी म्हणाले.

# धोतर नेसता येत नाही तो काय आम्हाला शिकवतो : खा. राऊत



**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. १२**

ज्याला धोतर नीट नेसता येत नाही तो काय आम्हाला अक्कल शिकवतो असे वक्तव्य शिवसेना (उबाठा) चे खासदार संजय राऊत यांनी माजी राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांचे नाव न घेता केले.

भगतसिंग कोश्यारी यांनी काल मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर टीका केली होती. राज ठाकरे हे नरेंद्र मोदींना का घाबरतात. त्यांनी मोदींना भेटावे असाही सल्ला दिला होता. त्यावर बोलताना खा. संजय राऊत यांनी कोश्यारी यांच्यावर टीका करीत म्हटले, मोदींना कोण घाबरतोय. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे संसदेत भाषण सुरू असताना पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शाह सभागृहाबाहेर निघून गेले. जो स्वत: धोतर नीट नेसू शकत नाही, तो राज ठाकरेंना सांगतोय मोदींना घाबरू नका. मोदींना कोण घाबरतो. मोदी आणि शाह यांच्या डोळ्यात डोळे घालून बोलण्याची आमच्यात हिंमत आहे. त्यांच्या हातात एजन्सी आणि सत्ता आहे म्हणून आम्हाला सांगतात. धोतर आधी नीट नेसायला शिका आणि मग महाराष्ट्रात येऊन आम्हाला अक्कल शिकवा. कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केला त्यालाच भाजपने पद्मभूषण पुरस्कार दिला. हा बाळासाहेब ठाकरेंचा विचार नाही. ऐवढेच नव्हे, तर कोश्यारी यांनी महात्मा फुले यांचा देखील अपमान केला होता अशीही टीका राऊत यांनी यावेळी केली.

# भारत बंदला शहरात संमिश्र प्रतिसाद



देशव्यापी बंदच्या समर्थनार्थ अंगणवाडी सेविकांनी संविधान चौकात धरणे दिली.

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १२**

दहा केंद्रीय कामगार संघटना आणि ४४ आद्योगिक फेडरेशनच्या निर्णयानुसार सिटूच्या नेतृत्वात आयोजित देशव्यापी बंदला नागपुरात संमिश्र प्रतिसाद मिळाला. दुपारी १२ वाजेपर्यंत सर्व प्रतिष्ठाने बंद होती. मात्र, दुपारनंतर दुकानदारांनी आपली दुकाने बंद सुरू केली.

चार श्रम कोड बिल रद्द करा, सेल्स प्रमोशन अॅक्ट सेवा शर्ती पुर्नजिवित करा व वैधानिक प्रतिनिधींच्या सर्वसामान्य कामकाजाचे वैधानिक नियम तयार करा, आठ तासाच्या कामासाठी ३० हजार रुपये किमान वेतन आणि दहा हजार रुपये मासिक पेंशन लागू करा, आशा, अंगणवाडी सेविका, शालेय पोषण आहार, महिला परिचर यांना किमान २६ हजार रुपये वेतन लागू करावे, शेतकऱ्यांची कर्जमाफी व शेतमालाला हमी भाव, शेतमजूर व असंघटीत कामगारांना किमान वेतन देण्यात यावे, जुनी मनरेगा योजना सुरू करावी आदी मागण्यांसाठी हा बंद पुकारण्यात आला होता.

बंद असल्यामुळे गुरुवारी सकाळपासूनच गांधीबाग, महाल, सीताबर्डी परिसरातील बाजारपेठा बंद होत्या. त्यामुळे बंदचा प्रभाव दिसून येत होता. दुपारनंतर या बाजारपेठा सुरू झाल्या. बंद दरम्यान, सकाळी ११ वाजता कॉटन मार्केट येथील खंडोबा मंदिर येथून मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा संविधान चौकात गेला. तेथे आंदोलनक नेत्यांची भाषणे झाली. सर्व नेत्यांनी आपल्या भाषणातून केंद्र शासनाच्या धोरणावर टीका केली.

**काही वेळ आपली बसही बंद**

बंदच्या आंदोलनात आपली बसचे कर्मचारी देखील सहभागी झाले होते. त्यामुळे सकाळच्या वेळी रस्त्यावर बसगाड्या दिसून येत नव्हत्या. काही वेळानंतर बसचे कर्मचारी आपल्या कामावर रूजू झाले.

**अंगणवाडी सेविकांची धरणे**

देशव्यापी बंदच्या समर्थनार्थ अंगणवाडी कर्मचारी सभेच्या वतीने अध्यक्ष मायाताई ढाकणे यांच्या नेतृत्वात संविधान चौकात धरणे देण्यात आली. दिवसभर धरणे दिल्यानंतर एका शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी विपीन इटनकर यांना आपल्या मागण्यांचे निवेदन दिले. धरणे आंदोलनात किसनाताई भानारकर, मनिषा पाटील, कल्पना अतकरे, ज्योर्तीगीता देशभ्रतार, जयश्री लोखंडे, मीना गजभिये, रागिनी भांगे, उषा हाडके, मंदा वैरागडे, विशाखा भोसकर, माधुरी फुलझेले, कविता साखरकर, प्रतिभा रामटेके, शुभांगी गोरे, उज्वला नारनवरे आदी अंगणवाडी सेविकांनी भाग घेतला होता.

# चंद्रपूरमध्ये शिवसेनेची भाजपशी हातमिळवणी

## राज ठाकरेंची नाराजी दूर करण्यासाठी संजय राऊत शिवतीर्थावर



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १२**

चंद्रपूर महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौर निवडणुकीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने भारतीय जनता पक्षासोबत जाण्याचा अनपेक्षित निर्णय घेतल्याने राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे. या निर्णयावर मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, त्यांची समजूत काढण्यासाठी खासदार संजय राूत यांनी आज तातडीने शिवतीर्थ निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली.

चंद्रपूर महापालिकेत सत्ता स्थापन करण्यासाठी कोणत्याही एका पक्षाकडे स्पष्ट बहुमत नव्हते. तेथे सत्तेची चावी ठाकरे गटाच्या हाती होती. शिवसेना काँग्रेससोबत जाईल अशी शक्यता असतानाच, स्थानिक पातळीवर शिवसेनेने भाजपशी हातमिळवणी केली. या नव्या करारानुसार, शिवसेनेला सव्वा वर्षासाठी महापौरपद मिळणार असल्याचे समजते. शिवसेनेच्या या भूमिकेमुळे महाविकास आघाडीत आणि विशेषतः मनसेमध्ये आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

मनसे नेते संदीप देशपांडे यांनी यावर प्रतिक्रिया देताना शिवसेनेच्या दुटप्पी भूमिकेवर टीका केली होती. यापूर्वी मनसेने भाजपशी जवळीक साधली असता शिवसेनेने त्यावर आक्षेप घेतला होता, मग आता शिवसेना भाजपसोबत कशी गेली, असा सवाल मनसेकडून विचारला जात आहे. राज ठाकरेंची हीच नाराजी लक्षात घेऊन संजय राऊत यांनी त्यांच्याशी सुमारे दीड तास चर्चा केली. या भेटीत चंद्रपूरमधील स्थानिक समीकरणे आणि भविष्यातील राजकीय भूमिकेवर चर्चा झाल्याचे समजते. मात्र, या चर्चेचा अधिकृत तपशील अद्याप समोर आलेला नाही.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत सुरक्षा रक्षकाचा मृत्यू

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १२**

अमरावती रोडवरील 'आयसीएआरएनडीएस' कार्यालया समोर रस्ता ओलांडणा-यएका वृद्ध सुरक्षा रक्षकाला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात गंभीर जखमी झालेल्या ६८ वर्षीय वृद्धाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. वाडी पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# पंतप्रधानांचे कार्यालय सेवा तीर्थ येथे जाणार

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. १२**

मागील पाच दशकांपासून सरकारच्या सर्व महत्वाच्या निर्णयाचे केंद्र राहिलेले साऊथ ब्लॉकमधील पंतप्रधानांचे कार्यालय आता ब्रिटीशकालीन इमारतीतून नव्या सेवा तीर्थ येथे जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या शुक्रवारी साऊथ ब्लॉकमध्ये शेवटची बैठक घेतील. त्यानंतर साऊथ ब्लॉकपासून काही अंतरावर असलेल्या रायसीना हिलजवळील नव्या प्रशस्त इमारतीचे उद्घाटन करतील.

शुक्रवारी कॅबिनेट बैठकीनंतर केंदीयमंत्री आणि अधिकाऱ्यांसोबत पंतप्रधान मोदी सेवा तीर्थला जातील. त्रेवा तीर्थ येथे पंतप्रधानांचे कार्यालय, कॅबिनेट सचिवालय, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार, इंडिया हाऊस आहे. इंडिया हाऊसमध्ये उच्चस्तरीय शिष्टमंडळाचा पाहुणचार करण्यासाठी बनविलेले नवीन ठिकाण आहे. सेवा तीर्थ १ मध्ये पंतप्रधान कार्यालय, सेवा तीर्थ २ मध्ये कॅबिनेट सचिवालय आणि सेवा तीर्थ ३ येथे राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालयासोबत राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांचे सुद्धा कार्यालय आहे. त्यात अजित डोवाल हे बसणार असून देशाच्या सुरक्षेबाबत योजना आखतील. जुन्या व्यवस्थेत या सर्व संस्था वेगवेगळ्या ठिकाणी कार्यरत होत्या. त्यातून संवेदनशील प्रकरणात समतोल साधणे आव्हानात्मक होते. सुमारे १२०० कोटी खर्च करून सेवा तीर्थ उभारण्यात आले आहे.

# ठाकरेंच्या सय्यदचा भाजपवर दणदणीत विजय

## काँग्रेसच्या साथीने परभणीत भाजपचा सत्तेचा स्वप्नभंग ?





**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १२**

राजकीय डावपेच आणि सत्तांतराच्या चर्चेने तापलेल्या परभणी महानगरपालिकेत अखेर उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने बाजी मारली आहे.

महापौरपदाच्या अटीतटीच्या लढतीत शिवसेना उमेदवार सय्यद इक्बाल यांनी भाजपच्या तिरुमला खिल्लारे यांचा १३ मतांच्या मोठ्या फरकाने पराभव करत महापालिकेवर भगवा फडकवला. चंद्रपूरमध्ये ज्याप्रमाणे भाजपने कमी संख्याबळ असताना सत्ता हस्तगत केली होती, तसाच काहीसा चमत्कार परभणीत घडवण्याचा भाजपचा प्रयत्न काँग्रेस आणि शिवसेनेच्या अभेद्य एकजुटीमुळे साफ फसला आहे.

महापौर निवडीच्या या नाट्यात काँग्रेसने घेतलेली निर्णायक भूमिका विजयाचे मुख्य कारण ठरली. स्वतःचे उमेदवार मागे घेत काँग्रेसने पूर्ण ताकद ठाकरेंच्या उमेदवारामागे उभी केली. मतदानापूर्वी दोन्ही पक्षांचे ३७ नगरसेवक एकाच बसमधून थेट सभागृहात दाखल झाल्याने भाजपच्या गोटात आधीच शांतता पसरली होती. प्रत्यक्ष मतदानात सय्यद इक्बाल यांना ३९ मते मिळाली, तर भाजपच्या उमेदवाराला २६ मतांवर समाधान मानावे लागले. महाविकास आघाडीच्या या रणनीतीमुळे भाजपला फोडाफोडीसाठी कोणतीही संधी उरली नाही. या निकालाने केवळ परभणीची सत्ताच ठरवली नाही, तर महाविकास आघाडीतील समन्वयाचा नवा पॅटर्नही सेट केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही नगरसेवकांनी भाजपला मतदान न करता तटस्थ राहणे किंवा सहकार्य न करणे, हे भाजपसाठी मोठे आत्मचिंतन करायला लावणारे ठरले आहे.

## ठाकरेंच्या शिवसेनेचा दुटप्पी चेहरा उघडा ?

**मुंबई, दि. १२**

परभणीत आम्ही सत्तेचा मोह बाजूला ठेवून आघाडी धर्म पाळला आणि शिवसेनेचा महापौर केला, पण चंद्रपुरात शिवसेनेने भाजपच्या कुशीत शिरून जो पाठीत खंजीर खुपसला, तो काँग्रेस कदापि विसरणार नाही, अशा तिखट शब्दांत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला सुनावले आहे. चंद्रपूर आणि परभणीतील महापौर निवडीच्या पार्श्वभूमीवर सपकाळ यांनी खासदार संजय राऊत यांच्यावर चोराच्या उलट्या बोंबा म्हणत जोरदार हल्ला चढवला. बुलढाणा येथे बोलताना सपकाळ यांनी शिवसेनेच्या भूमिकेचे वाभाडे काढले. चंद्रपुरात शिवसेनेच्या ८ नगरसेवकांनी भाजपला उघड मतदान केले, ही राजकीय गद्दारी आहे.

# ट्रकच्या धडकेत बापलेकीचा मृत्यू

## संतप्त जमावाकडून ट्रक जाळला, पोलिस वाहनाची तोडफोड



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १२**

उमरेडजवळील मोहपा कुंभारी मार्गावर गुरुवारी सकाळी झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वार वडील आणि मुलीचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांच्या सोबत असलेली मैत्रीण गंभीर जखमी झाली. या घटनेनंतर परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून संतप्त जमावाने संबंधित टिप्परला आग लावून पोलिसांच्या वाहनाची तोडफोड केली.

मिळालेल्या माहितीनुसार, मोहपा येथील सुभाष केशव भिवनकर (वय ५५) हे गुरुवारी सकाळी सुमारे १० वाजता त्यांची मुलगी जान्हवी सुभाष भिवनकर (वय १८) आणि तिची मैत्रीण वंशिका ज्ञानेश्वर नरुळे (वय १८) यांना घेऊन उमरेडकडे निघाले होते. जान्हवी आणि वंशिका या बारावीच्या बोर्ड परीक्षेसाठी जात होत्या. उमरेडपासून सुमारे १० किलोमीटर अंतरावर मोहपा-कुंभारीजवळ हा अपघात घडला.

एमएच ४०/बीजी ७७५० क्रमांकाच्या टिप्पर चालकाने बेपर्वाईने आणि भरधाव वेगाने वाहन चालवत दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेनंतर तिघेही रस्त्यावर फेकले गेले. सुभाष भिवनकर आणि जान्हवी यांचा जागीच मृत्यू झाला, तर वंशिका नरुळे हिला गंभीर दुखापत झाली असून तिला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातानंतर टिप्पर चालक वाहन घटनास्थळी सोडून फरार झाला. घटनेची माहिती मिळताच मोठ्या संख्येने नागरिक घटनास्थळी जमले. संतप्त जमावाने संबंधित टिप्परला आग लावली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी प्रयत्न केले; मात्र जमावाने पोलिसांच्या वाहनाचीही तोडफोड केली.

घटनेची माहिती मिळताच पोलिस अधीक्षक, उपविभागीय पोलिस अधिकारी व इतर वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. दुपारपर्यंत परिसरात तणावपूर्ण वातावरण होते आणि मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. फरार टिप्पर चालकाचा शोध सुरू असून पुढील तपास उमरेड पोलीस करीत आहेत.

# भारत जोडोचा विचार आज नव्याने मांडण्याची गरज : कुमार केतकर

- बाबा आमटे राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यातून सामाजिक सलोख्याचे आवाहन
- ओ. पी. शहा यांना जीवनगौरव, माधव बावगे यांना सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार



**ओ.पी. शहा (कोलकाता) आणि माधव बावगे यांना पुरस्कृत करून त्यांचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार व माजी खासदार कुमार केतकर, अॅड. असीम सरोदे, एबीपी माझाच्या संपादिका सरिता कौशिक, डॉ. अशोक बेलखोडे, रविंद्र शिंदे (चंद्रपूर) उपस्थित होते.**

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १२**

"१९८५ साली बाबा आमटे यांची भारत जोडो यात्रा निघाली नसती, तर देशात मोठा सामाजिक कलह निर्माण झाला असता. आज हिंदू-मुस्लिमद्वेष ज्या वेगाने वाढतो आहे, त्या पार्श्वभूमीवर बाबांच्या विचारांची पुन्हा नितांत गरज आहे,'' असे ठाम प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार व माजी खासदार कुमार केतकर यांनी केले. बाबा आमटे यांच्या मानवतावादी विचारांचा वारसा पुढे नेणाऱ्या 'बाबा आमटे एकता अभियान'तर्फे आयोजित राष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. मुंबईत पार पडलेल्या या कार्यक्रमात सामाजिक सलोखा, विवेकवाद आणि माणुसकी जपण्याचा ठाम संदेश देण्यात आला.

या दिमाखदार सोहळ्यात कोलकात्याचे प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते व भारत जोडो अभियानाचे वरिष्ठ संयोजक श्री. ओ. पी. शहा ((कलकत्ता) यांना 'बाबा आमटे जीवनगौरव राष्ट्रीय पुरस्कार२०२६' तर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष आणि विवेकवादी चळवळीचे अग्रणी कार्यकर्ते श्री. माधव बावगे (लातूर) यांना 'बाबा आमटे सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.या सोहळ्याला विचार पिठावर ज्येष्ठ पत्रकार व माजी खा. कुमार केतकर ख्यातनाम विधी तज्ज्ञ अॅड. असीम सरोदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एबीपी माझाच्या संपादक सरिता कौशिक होत्या सह डॉ अशोक बेलखोडे, रविंद्र शिंदे चंद्रपूर, व्यंकटेश जोशी मुंबई आदी नामवंत मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण झाले. या राष्ट्रीय पुरस्काराचे स्वरूप एक लक्ष रुपये रोख, शाल, सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे होते. कार्यक्रमाला सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते, विचारवंत, पत्रकार, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर आपल्या मनोगतात ओ. पी. शहा यांनी अत्यंत भावुक शब्दांत बाबा आमटेंशी असलेले नाते उलगडले. ते म्हणाले, "जर बाबा आमटे मला भेटले नसते, तर कदाचित मी सामाजिक कार्याच्या या वाटेवर आलोच नसतो. बाबांनी भारत जोडोची संकल्पना माझ्या मनात रुजवली. आज मी वेगवेगळ्या देशांमध्ये सामाजिक कार्य करत असलो, तरी त्या कामाच्या मुळाशी बाबांचीच प्रेरणा आहे.

पुरस्काराला उत्तर देताना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते माधव बावगे म्हणाले, "हा पुरस्कार माझा वैयक्तिक नाही, तर माझ्यासोबत अंधश्रद्धा निर्मूलन आणि सामाजिक समतेसाठी रस्त्यावर उतरलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याचा आहे. आम्ही बाबा आमटे यांच्यासोबत अनेक वर्षे काम केले. त्यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन राज्यभर वेगवेगळ्या विषयांवर चळवळ उभी केली. त्या कार्याला समाजाकडून मोठा प्रतिसाद मिळाला आणि त्यातून दीर्घकाळ टिकणारे समाजकारण उभे राहिले. या पुरस्कारामुळे विज्ञाननिष्ठ, विवेकी समाज घडवण्याच्या आमच्या लढ्याला नवी ऊर्जा मिळाली आहे.''

अॅड. असीम सरोदे यांनी आपल्या भाषणातून सध्याच्या सामाजिक परिस्थितीवर तीव्र शब्दांत भाष्य केले. ते म्हणाले, "आज सामाजिक काम करताना अनेक अडचणी येतात. पुढून होणारे अनेक वार हे धार्मिक स्वरूपाचे असतात. राजकारणातून निर्माण होणारी उदासीनता ही समाजाच्या मानसिक स्वास्थ्याचा भाग बनत चालली आहे. धार्मिक अनुकरणाच्या खोट्या पद्धती समाजात खोलवर रुजवल्या जात आहेत. याला आळा घालण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र पुढाकार घेणे आवश्यक आहे. बाबा आमटेंचे विचार आज अधिक धारदारपणे मांडण्याची गरज आहे.''

सध्याच्या सामाजिक परिस्थितीवर भाष्य करताना केतकर पुढे म्हणाले, "आजचे वातावरण अत्यंत गंभीर आहे. हिंदूमुस्लिम द्वेष ज्या पद्धतीने वाढतो आहे, तो थांबवण्यासाठी बाबा आमटे यांच्या भारत जोडो विचारांची पुन्हा एकदा नितांत गरज आहे. सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मता टिकवण्यासाठी हा विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे काळाची गरज आहे.''

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना सरिता कौशिक म्हणाल्या, "आजही समाजात अनेक चांगले लोक निःस्वार्थपणे काम करत आहेत. त्यांच्याकडून आपण प्रेरणा घेतली पाहिजे. जात, धर्म, आर्थिक विषमता या नावाखाली समाज तुटत चालला आहे. ग्रामीण भागातील परिस्थिती अधिक गंभीर आहे. अशा काळात ओ. पी. शहा आणि माधव बावगे यांच्यासारख्या कार्यकर्त्यांचे काम समाजाला दिशा देणारे आहे.''

यावेळी उपाध्यक्ष डॉ. सोमनाथ रोडे, सचिव डॉ. अशोक बेलखोडे, सहसचिव नफिसा कोलंबोवाला, कोषाध्यक्ष गिरीश पदमावार यांच्यासह संस्थेचे राष्ट्रीय प्रतिनिधी सय्यद , जेकब नेल्लीथानम, अनिल हेब्बर, विजय भारतीया, सुजाता राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.

बाबा आमटेंच्या विचारांचा जागर करणारा हा पुरस्कार सोहळा केवळ सन्मानाचा कार्यक्रम न राहता, सामाजिक सलोखा, विवेकवाद आणि मानवतावाद यांचे सशक्त आवाहन ठरला. उपस्थित प्रत्येकाच्या मनात 'भारत जोडो'चा संदेश अधिक ठामपणे रुजवणारा हा कार्यक्रम सामाजिक चळवळीच्या इतिहासात एक महत्त्वाचा टप्पा ठरला.

दैनिक
युवाराष्ट्र दर्शन
बेरोजगार युवकांचा मार्गदाता
# यवतमाळ
शुक्रवार, १३ फेब्रुवारी २०२६
जिल्हा



## लाडखेडचे सरपंच दिनेश इंगोले यांचे सदस्यत्व रद्द

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी दारव्हा**

तालुक्यातील राजकीयदृष्ट्या चर्चेत असलेल्या लाडखेड ग्रामपंचायतीचे सरपंच दिनेश इंगोले यांचे ग्रामपंचायत सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे. पत्नीच्या नावे शासकीय जागेवर अतिक्रमण केल्याचा ठपका ठेवत ही कारवाई करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, सरपंच दिनेश इंगोले यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून गावातील विनोद लक्ष्मण कोडापे यांच्या भोगवट क्रमांक २ मधील जागा पत्नीच्या नावे केल्याचा आरोप करण्यात आला होता. संबंधित जागा ही शासकीय मालमत्ता व भोगवट क्र. २ ची असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी ग्रामपंचायत सदस्य हमीद खॉ मन्सूर खॉ पठाण यांनी अप्पर जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे तक्रार दाखल करून महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम १४ (१) (ज-३) नुसार कारवाईची मागणी केली होती. शासकीय अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झाल्याने ११ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या आदेशानुसार दिनेश इंगोले यांचे ग्रामपंचायत सदस्यत्व रद्द करण्यात आले.या निर्णयामुळे लाडखेडसह संपूर्ण तालुक्यात राजकीय वातावरण ढवळून निघाले असून पुढील राजकीय घडामोडींना वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

युवाराष्ट्र दर्शन
-: कार्यालयीन पत्ता :-
गुरुमाऊली सोसायटी, दाते कॉलेज रोड, जुना उमरसरा, यवतमाळ ४४५००१
-: जिल्हा प्रतिनिधी :-
संजय सावरकर मो. ९४२१८४४८७०
* एजन्सीसाठी संपर्क
ई-मेल ssawarkar43@gmail.com

## संक्षिप्त

### बांधकाम कामगारांना अत्यावश्यक साहित्याचे वाटप तालुकास्तरावर होणार !

**•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदणीकृत जीवित (सक्रिय) बांधकाम कामगारांना गृहपयोगी व सुरक्षा संच आणि अत्यावश्यक साहित्याचे वाटप तालुकास्तरावर करावे. जेणेकरून इतर तालुक्यातील कामगारांची गैरसोय होणार नाही व गर्दी टळेल. तसेच जिल्ह्याची कायदा व सुव्यवस्थाअबाधित राहील याची दक्षता घेण्यात यावी, असा आदेश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिला आहे. सरकारी कामगारअधिकारी कार्यालयाच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, नोंदणीकृत बांधकाम कामगारांना पुसद व दारव्हा येथे गृहपयोगी व सुरक्षा संच तसेच अत्यावश्यक साहित्याचे वाटप सुरू होते. मात्र, या वाटपावेळी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याची दखल घेऊन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी हे वाटप तत्काळ बंद करण्याचे आदेश दिले आहेत.

### झरी जामणीत 'संपूर्णता अभियाना'ला प्रारंभ

**•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ,**

: निती आयोगाच्या आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत झरी जामणीत "संपूर्णता अभियान 2.0" चे उद्घाटन आमदार संजय देरकर यांच्या हस्ते पंचायत समितीच्या मुख्य सभागृहात नुकताच पार पडले.या कार्यक्रमास तालुक्यातील 54 ग्रामपंचायतींचे सरपंच, लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत विकास अधिकारी तसेच विविध विभागांचे तालुकास्तरीय अधिकारी उपस्थित होते. 28 जानेवारी ते 14 एप्रिल या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या अभियानांतर्गत महिला व बालविकास, पशुसंवर्धन, आणि शिक्षण विभागांनी एकत्रितपणे काम करुन दर्शकांची 100 टक्के संपृक्तता साध्य करण्याचे आवाहन आमदार संजय देरकर यावेळी केले. या दर्शकांमध्ये महिला व बालविकास विभागांतर्गत 6 महिने ते 6 वर्षे वयोगटातील पूरक आहार घेणारी मुले, अंगणवाडी केंद्रातील नोंदणीकृत मुलांची मोजमाप कार्यक्षमता, कार्यरत शौचालय असलेली अंगणवाडी केंद्रे तसेच पिण्याच्या पाण्याची सुविधा असलेली अंगणवाडी केंद्रे हे दर्शक निश्चित करण्यात आले आहेत.

# मंत्री राठोड यांच्या पाठपुराव्याला यश

## बंजारा आरक्षणासाठी निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ दि. १२**



बंजारा समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करण्यासाठी आयोग/ समिती नेमावी. या मागणीला अखेर यश मिळाले असून उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत झाली आहे. याबाबतचा शासन निर्णय लवकरच निर्गमित होणार असल्याची माहिती मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिली.

या निर्णयामागे मंत्री राठोड यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे स्पष्ट झाले आहे.

मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्र बंजारा आरक्षण कृती समितीच्या सदस्यांनी मुंबई येथे मंत्री संजय राठोड यांची भेट घेऊन आरक्षणाचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची मागणी केली होती. गेल्या चार महिन्यांपासून हा विषय शासन पातळीवर सातत्याने मांडला जात असून, संबंधित विभागांशी समन्वय साधत मंत्री राठोड यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. समाजाच्या मागणीबाबत शासन सकारात्मक असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले होते.

त्याच दिवशी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंत्री राठोड यांनी हा विषय पुन्हा उपस्थित केला असता, मागणीनुसार निवृत्त उच्च न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. यामुळे बंजारा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीला अधिकृत प्रक्रियेत गती मिळाली आहे. यानंतर मंत्री राठोड यांनी आरक्षण कृती समितीच्या सदस्यांसोबत सविस्तर चर्चा करत समितीसमोर अभ्यासपूर्ण, वस्तुनिष्ठ आणि तथ्याधारित मांडणी करण्याचे आवाहन केले. समितीसमोर ठोस ऐतिहासिक, सामाजिक आणि कायदेशीर आधार सादर केल्यास निर्णय प्रक्रियेला बळ मिळेल, असे त्यांनी सांगितले. या निर्णयाबद्दल महाराष्ट्र बंजारा आरक्षण कृती समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच मंत्री संजय राठोड यांचे आभार मानले. या यशामागे मंत्री राठोड यांनी केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि समाजाच्या मागणीला शासन पातळीवर मिळवून दिलेले प्राधान्य हेच निर्णायक ठरल्याची भावना समाजातून व्यक्त होत आहे.

# वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष!

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, पुसद, दि. १२ फेब्रुवारी**

शहरापासून अवघ्या पाच किलोमीटर अंतरावर पुसद-वाशिम राज्यमार्गावरील रस्त्यावर येलदरी घाटात वन विभागाची तब्बल ३ हेक्टर जमीन पडून आहे. येथे वनविभागाने मागिल काही वर्षांपूर्वी मोठा गाजावाजा करत शासनाचा लाखो रुपये निधी खर्च करुन प्रत्येकाला काही क्षण दुःखाचे असल्यास ते आनंदाचे करता यावे यासाठी व या क्षणांना आठवणीत कायम गुंतून ठेवण्यासाठी तत्कालीन पुसद वनविभागाच्या वतीने उपवनसंरक्षक अरविंद मुंढे यांच्या संकल्पनेतून येलदरी घाटातील जंगल परिसरात 'स्मृतीवन' साकारण्यात आले. मात्र या सहा वर्षात पुसद वनविभागाच्या वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या ढिसाळ कारभारामुळे या स्मृती वनाची संपूर्ण वाट लागली असून या स्मृतीवनात फार मोठी वृक्ष नसली तरी लहान झाडा-झुडपांनी व गवताने हा परिसर व्यापला आहे. त्यामुळे या स्मृती वनांची पूर्णतः लयाला गेल्याने या स्मृतीवनावर देखभाल दुरुस्तीसाठी शासनाकडून लाखो रुपयांचा निधी कागदोपत्री दाखवून हडप केला की काय ?असा प्रश्न पर्यावरण प्रेमीं विचारु लागले आहेत या वनविभागाच्या संतापजनक प्रकारामुळे येथे येणाऱ्या पर्यटक,निसर्गप्रेमींमध्ये प्रचंड नाराजी असुन संताप व्यक्त करीत आहेत.याबाबत सुत्रांनी दिलेली माहिती अशी की, मागील वर्षी वर्षांपूर्वी पुसद शहरापासून अवघ्या पाच किलोमीटर अंतरावर पुसद-वाशिम राज्यमार्गावरील रस्त्यावर येलदरी घाटात वन विभागाची तब्बल ३ हेक्टर जमीनीवर वनविभागाच्या उपवनसंरक्षक अरविंद मुंढे यांच्या संकल्पनेतून मोठा गाजावाजा करत शासनाचा लाखो रुपये निधी खर्च करुन स्मृती वनांची निर्मिती करण्यात आली होती पुसद -वाशीम राज्यमार्गाला लागुन असलेल्या खंडाळा-येलदरी सागवृक्षराजाचा विलोभनीय परिसर आहे.त्याच राज्य मार्गाला लागुनच तीन हेक्टर क्षेत्रात वनविभागाने शासनाचा लाखो रुपये निधी खर्च करीत या निसर्गरम्य स्मृतिवनाची निर्मिती करण्यात आली.

या येलदरी पठाराला तीनही बाजूला दरी असून त्यावर १ हजार ८०० वड, पिंपळ, जांभूळ, उंबर, चिंच अशा विविध प्रजातीचे वृक्ष लावण्यासाठी मोठं मोठे खड्डे तयार करण्यात आले . त्यासाठी आठ खंडांची व्यवस्था केली होती. एखाद्या कुटुंबात बाळाचा जन्म झाला असेल, कुणाचे लग्न वा परीक्षेतील नेत्रदीपक यश असा आनंद प्रसंग या स्मृतीवनात आवडेल ते रोपटे लावून साजरा करण्याची तर कुणाच्या कुटुंबातील व्यक्तीचे निधन झाल्यास किंवा सुख-दुखः त्यांच्यासाठी या स्मृती वृक्षारोपणातून जपण्यासाठी तजवीज करण्यात आली होती.

# आरोग्य शिबिराचा 1215 नागरिकांनी घेतला लाभ

## बाबा कंबलपोष उर्समध्ये 6 दिवसीय मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, आर्णी, दि. १२ फेब्रुवारी**



बाबा कंबलपोष दरगाह ट्रस्ट, आर्णी यांच्या वतीने बाबा कंबलपोष र.अ. उर्स शरीफ–2026 निमित्त सलग सहा दिवस मोफत आरोग्य तपासणी व औषध वितरण वैद्यकीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा एकूण 1215 रुग्णांनी लाभ घेतला. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही 5 फेब्रुवारी ते 10 फेब्रुवारी दरम्यान हे शिबिर घेण्यात आले. या शिबिरात विविध तज्ज्ञ डॉक्टरांनी आपली सेवा दिली. जनरल फिजिशियन म्हणून डॉ. विक्रम ठवकर यांनी 68, डॉ. अरुण वाघ यांनी 100, डॉ. बाबर बेग यांनी 70, डॉ. रोहित मोहरे यांनी 65, डॉ. राम पद्मावार यांनी 64, डॉ. फैजान खान यांनी 70, डॉ. सतीश कोल्हे यांनी 60, डॉ. मनीष राठोड यांनी 101 तसेच डॉ. विनोद जाधव यांनी 10 रुग्णांची तपासणी केली. स्त्रीरोग तज्ज्ञ म्हणून डॉ. फातेमा मिर्झा, डॉ. निलोफर खान, डॉ. फैजान मिर्झा, डॉ. प्रफुल्ल गिरी आणि डॉ. अंकित चिंतावार यांनी महिलांची तपासणी केली. तसेच डॉ. आयशा शेख, डॉ. गाजी खान, डॉ. अनिल आखरे, डॉ. हितेश दुधे, डॉ. अर्चना गजभिये, डॉ. पाशु शेख, डॉ. पीयूष कोडगिरवार आणि डॉ. हर्षल राठोड यांनी रुग्णांवर उपचार केले. मानवतेच्या सेवेसाठी केलेल्या या मोलाच्या कार्याबद्दल बाबा कंबलपोष दरगाह ट्रस्टच्या वतीने सर्व तज्ज्ञ डॉक्टरांना स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

# सामाजिक पुरस्कार व गुणवंतांना पारितोषिक वितरण

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, पांढरकवडा, दि. १२ फेब्रुवारी**



येथील केशरबाई चाहल स्मृती प्रतिष्ठान,पांढरकवडा यांच्या वतीने मातोश्री केशरबाई चाहल यांच्या ३८ व्या स्मृतीदिनानिमित्त भव्य सन्मान गौरव व गुणवंत विद्यार्थी पारितोषिक वितरण समारंभ 10 फेब्रुवारीला पांढरकवडा येथे श्री शारदा ज्ञानपीठच्या प्रांगणात सायंकाळी 6 वाजता आयोजित केला गेला. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव तसेच शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार या कार्यक्रमात करण्यात आला. पुरस्कार वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते व माजी मंत्री शिवाजीराव मोघे उपस्थित होते .प्रमुख अतिथी म्हणून नागपूर येथील ज्येष्ठ पत्रकार,संपादक व प्रभावी वक्ते तसेच पांढरकवड्याचे सुपुत्र बाळ कुळकर्णी उपस्थित होते . अतिथी म्हणून विस्तार अधिकारी पांढरकवडा पंचायत समिती (शिक्षण) गोकुल गंधे कार्यक्रमाला उपस्थित होते. संस्थेच्या वतीने सन २०२४–२५ चा 'केशरबाई चाहल स्मृती सामाजिक पुरस्कार' पांढरकवडा येथील हिंदू–मुस्लिम एकता व सामाजिक सौहार्दाचे प्रतीक म्हणून ओळखले जाणारे काजी गजनफर अली साहेब (माजी मुख्याध्यापक, तथा जामा मशीद ट्रस्ट व शांतता कमिटी अध्यक्ष पांढरकवडा) यांना जाहीर झाला होता. या पुरस्काराचे स्वरूप ११ हजार रुपये रोख,शाल आणि स्मृतिचिन्ह असे आहे .समाजात सलोखा,परस्पर आदर आणि शांततेचा संदेश देत त्यांनी केलेल्या कार्याची दखल म्हणून त्यांचा गौरव करण्यात आला, तसेच सन २०२३–२४ चा केशरबाई स्त्री पुरस्कार संवेदनशील कवयित्री,समीक्षक व चिंतनशील लेखिका श्रीमती पुष्पा पाटील (मीना बिसेटवार),पुणे यांना जाहीर झाला होता. साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना ५ हजार रुपये रोख,शाल व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. शैक्षणिक सत्र २०२४–२५ मधील शालांत परीक्षेत उत्कृष्ट यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना यावेळी पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. त्यामध्ये शेखर सुरेश मल्लेलवार शाळेत प्रथम (९५.६०%) : २१०० रुपये रोख (संस्थेतर्फे),कु.कल्याणी विष्णू कराळे 'मराठी' विषयात प्रथम (९८ गुण) : १००० रुपये रोख, कु.टिया हरिभाऊ गुरनुले 'इंग्रजी' विषयात प्रथम (९८ गुण) : ५०० रुपये कु.हंसिका मनिष बुरेवार व कु.साची दिपक वरगणे 'गणित' विषयात प्रथम (९७ गुण) : प्रत्येकी ५०० रुपये रोख , कु.श्रुती राजीव आगरकर व शेखर सुरेश मल्लेलवार 'विज्ञान' विषयात प्रथम (९८ गुण) : प्रत्येकी ५०० रुपये रोख असे पारितोषिक देण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन शाळेचे व्यवस्थापक तनवीर शेख यांनी आणि परिचय प्रिया उमरे यांनी केले तर मुख्याध्यापक राहुल देवतळे यांनी आभार प्रदर्शन केले. केशरबाई चाहल यांच्या स्मृती जपतांना समाजहित, शिक्षणप्रेम आणि स्त्री-सक्षमीकरण या मूल्यांचा प्रसार करण्यासाठी प्रतिष्ठान सातत्याने कार्यरत राहतील तसेच 2026चा स्मृतीदिन सोहळा सामाजिक सलोखा,साहित्यिक परंपरा आणि शैक्षणिक गुणवत्तेचा उत्सव ठरणार असल्याची भावना संस्थेच्या आणि शाळेच्या अध्यक्ष डॉ. अजितसिंह यांनी आपल्या प्रास्ताविकेतून नमूद केले, शाळेच्या प्रांगणात या सोहळ्याला शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, गुणवंत विद्यार्थी पालक,तसेच शाळेचे सर्व शिक्षक,कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'एआय'च्या युगात तरुणांनी सावधगिरी बाळगण्याची गरज

## पोहरागडचे महंत चंद्रशेखर महाराज यांचा उपदेश



**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, दिग्रस, दि. १२ फेब्रुवारी**

सध्याचे युग हे 'एआय'ने भरलेले आहे. ही संगणकीय प्रणाली जी माणसासारखं विचार करू शकते, शिकू शकते, निर्णय घेऊ शकते आणि समस्या सोडवू शकते. मात्र तरुणांनी पूर्णवेळ यामध्ये न अडकता सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. शिवाय युवकांनी व्यसनापासून दूर राहून आपले हित जपावे, असा उपदेश बालब्रह्मचारी संत रामराव महाराज यांचे उत्तराधिकारी, महंत शेखर महाराज (पोहरादेवी) यांनी उपस्थित तरुणांना दिला. तालुक्यातील डोळंबा येथे जगदगुरु संत सेवालाल महाराज यांच्या २८७ व्या आगामी जयंती निमित्ताने आयोजित धार्मिक कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी चंद्रशेखर महाराज यांची सजवलेल्या रथातून गावातील मुख्य मार्गावरून ढोलताशे, लेझीम, डफड्याच्या तालात भक्तिमय उत्साहात भव्य मिरणूक काढण्यात आली. यावेळी 'जय सेवालाल'च्या जयघोषाने अवघा परिसर दणाणून गेला होता. कार्यक्रमस्थळी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन चंद्रशेखर महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकाश जाधव यांनी तर प्रस्तावना शंकर महाराज यांनी केली. आभार भिमराव खारोडे यांनी मानले. यावेळी मंचावर ह. भ. प. गुलाब महाराज, प्रभूसिंग नाईक, शंकरगिरी महाराज, रमेश पवार, अरुण राठोड, कैलास चव्हाण, चैनसिंग जाधव, पी. बी. राठोड, सुनील देशमुख आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पुजारी गणेश राठोड, भगवान राठोड, नितीन नाईक, डोमा राठोड, विनोद राठोड, गुणवंत राठोड, प्रल्हाद चव्हाण, आकाश जाधव, उत्तम राठोड, माणिक राठोड यांनी परिश्रम घेतले.

**संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृद्धी योजनेअंतर्गत मंदिरोसमोरील सिमेंट रस्त्यासाठी १० लाखांचा निधी मंजूर करणार असल्याचे तांडा वस्ती सुधार समितीचे अशासकीय सदस्य शंकरगिरी महाराज यांनी कार्यक्रमात आश्वासित केले.**

# न्यूज मिडिया पत्रकार असोसिएशनच्या कार्यकारिणीची फेरनिवड

## अध्यक्षपदी दिपक छाजेड, उपाध्यक्षपदी शेख इक्बाल



**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, वणी, दि. १२ फेब्रुवारी**

न्यूज मिडिया पत्रकार असोसिएशनची बैठक साप्ताहिक मुक्त ललकार कार्यालयात उत्साहात पार पडली. बैठकीदरम्यान विद्यमान कार्यकारिणीचे कामकाज समाधानकारक व सुरळीत सुरू असल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले. यावेळी सर्वानुमते जुन्याच कार्यकारिणीची फेरनिवड करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार अध्यक्षपदी दिपक छाजेड, उपाध्यक्षपदी शेख इक्बाल तसेच सचिवपदी परशुराम पोटे यांची फेरनिवड करण्यात आली. बैठकीस माजी अध्यक्ष आसिफ शेख, महादेव दोडके, विशाल ठोंबरे, प्रविण शर्मा, दिपक छाजेड, परशुराम पोटे, इक्बाल शेख यांच्यासह असोसिएशनचे इतर सदस्य उपस्थित होते. नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचे उपस्थितांनी अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

**नावात बदल**

माझे जुन्या पासपोर्ट वर जुने नाव : MOHAMMAD SALEEM ABDUL GANEE हे होते. त्यानंतर जन्म प्रमाणपत्रावर नाव MOHAMMAD SALEEM GANIBHAI KHAKHU हे केले. आता या वरील दोन्ही नावात बदल करुन माझे नविन नाव MOHAMMAD SALEEM ABDUL GANEE KHAKHU हे आहे. तरी वरील तिन्ही नावाची व्यक्ती एकच असुन या पुढील व्यवहारात मला माझ्या नविन नावानेच ओळखावे.

**MOHAMMAD SALEEM ABDUL GANEE KHAKHU**
**ADDRESS : TARPURA, ATHWADI BAJAR**
**YAVATMAL 445001 MAHARASHTRA**

**CHANGE OF NAME**

**I SHABANA PARVEEN ZAKIULLHA KHAN** HAVE CHANGED MY NAME FROM **SHABANA PARVEEN ZAKIULLAHKHAN TO SHABANA PARVEEN ZAKIULLHA KHAN** FOR ALL FUTURE PURPOSES.
**Name & Add:-** SHABANA PARVEEN
ZAKIULLHA KHAN,
Yavatmal. 9359993686

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-3/कावि/116/2026
तहसिलदार उमरखेड यांचे कार्यालय, उमरखेड
दिनांक : 09/02/2026

**प्रति,**

1. ग्राम महसुल अधिकारी, विडुळ
2. ग्राम पचांयत अधिकारी, विडुळ

**विषय:** शे कलीम शे यासीन रा. विडुळ. ता. उमरखेड त्यांचा स्वताचा जन्म मौजा विडुळ ता. उमरखेड येथे दि-05/07/1977 रोजी झाल्याबाबत.

**संदर्भ :- 1)** महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय क्रमांक:जमृनों 2525/(ई.ऑ.191181)/प्र.क्र.22 कु.क दिनांक 12 मार्च, 2025
**2)** मा. उप सचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक संकिर्ण 2025/प्र.क्र.03/ई-1 अ दिनांक 17 मार्च, 2025
3) मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे पत्र क्रमांक/गृहशाखा/डेस्क-12/कावि/556/2025 दिनांक 17.03.2025

उपरोक्त विषयाचे संदर्भाय शासन निर्णय व पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, **शे कलीम शे यासीन** रा. विडुळ ता.उमरखेड त्यांचा स्वताचा जन्म मौजा ढाणकी ता. उमरखेड येथे **दि-01/07/1965** रोजी झालेला आहे. जन्म अनुउपलब्धता उपलब्ध नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

त्याअनुषंगाने अर्जदार **शे कलीम शे यासीन** रा. विडुळ, त्यांचा स्वताचा जन्म झाल्यापासुन ते विलंबाच्या जन्म नोंदीच्या अनुषंगाने अर्ज सादर करेपर्यंतच्या कालावधीत कोठे वास्तव्य केले याबाबत स्थानीक चौकशी करून वस्तुस्थितीदर्शक अहवाल आपले अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा.

**स्वा/-**
**तालुका दंडाधिकारी**
**उमरखेड**

# महाराष्ट्राचा पहिला 'पुनर्वनीकरण' कार्यक्रम यशस्वी

## पैनगंगा अभयारण्यात मादी वाघीणीचे यशस्वी स्थलांतर : रोजगार निर्मितीच्या नवीन संधी

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, ढाणकी, शेख इरफान**



पैनगंगा वन्यजीव अभयारण्याच्या दृष्टीने अत्यंत आनंदाची व ऐतिहासिक घडामोड घडली असून महाराष्ट्रातील पहिला 'पुनर्वनीकरण' कार्यक्रम यशस्वी ठरला आहे. ७जानेवारी २०२६ रोजी पीकेटी-७ सीपी-२ ही पेंच अभयारण्यातील मादी वाघीण पैनगंगा वन्यजीव अभयारण्यात यशस्वीपणे स्थलांतरित करण्यात आली असून ती आता अभयारण्यात पूर्णपणे स्थिरावली आहे. तिला एक महिना पूर्ण झाला असून तिची प्रकृती व हालचाली समाधानकारक असल्याची माहिती वन विभागाकडून देण्यात आली आहे.

पैनगंगा अभयारण्यात २०१८-१९ पासून पीएनजी-१ (जॉनी) हा नर वाघ अधिवास करत आहे. गेल्या सहा-सात वर्षांपासून तो येथे वास्तव्य करत असताना भविष्यात जवळच्या नात्यातील संकर (आंतरसंकर) मुळे उद्भवू शकणाऱ्या संभाव्य धोक्यांचा मुद्दा ढाणकी येथील वन्यजीव प्रेमी प्रतिक राठोड यांनी १ जुलै २०२४ रोजी वनमंत्रालयाकडे सादर केलेल्या निवेदनातून मांडला होता. अभयारण्यात मादी वाघीण स्थलांतरित करून वाघांची सुदृढ संख्या वाढविण्याची मागणी त्यांनी केली होती.

या मागणीची गांभीर्याने दखल घेत वनमंत्री गणेश नाईक, माजी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, विशेष कार्य अधिकारी महेश शेवाळे (वन मंत्रालय), प्रमुख मुख्य वन्यजीव संरक्षक श्रीनिवास रेड्डी (महाराष्ट्र राज्य) तसेच पांढरकवडा वन्यजीव विभागाने यावर दोन वर्षे अभ्यास केला. अखेर यावर सकारात्मक निर्णय घेत कार्यवाही करण्यात आली. पेंच अभयारण्यातील एक मादी वाघीण येथे स्थलांतरित करण्यात आली. समन्वित प्रयत्नांतून महाराष्ट्रातील पहिला पुनर्वनीकरण उपक्रम प्रत्यक्षात उतरला.

या उपक्रमामुळे पैनगंगा अभयारण्यात सुदृढ वाघांची संख्या वाढण्यास चालना मिळणार असून अनुवांशिक विविधता टिकविण्यास मदत होणार आहे. त्यामुळे वाघांचे दीर्घकालीन भविष्य अधिक सुरक्षित होईल, असा विश्वास वनपरिक्षेत्र अधिकारी धिरज मदने यांनी व्यक्त केला. दरम्यान, पैनगंगा अभयारण्यातील पर्यटनालाही नवे बळ मिळाले आहे. खरबी प्रवेशद्वार व मन्याळी प्रवेशद्वार येथे सकाळ-संध्याकाळ प्रत्येकी सात वाहनांच्या वनभ्रमंती सुरू करण्यात आल्या असून पर्यटक मोठ्या उत्साहाने या वनभ्रमंतीचा आनंद घेत आहेत. या उपक्रमामुळे स्थानिकांना रोजगार उपलब्ध होत असून परिसराच्या शाश्वत विकासालाही चालना मिळत आहे. वन्यजीव संवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि स्थानिक विकास या तिन्ही आघाड्यांवर सकारात्मक पाऊल टाकत पैनगंगा वन्यजीव अभयारण्य महाराष्ट्राच्या संवर्धन इतिहासात नवा अध्याय रचत आहे.

## सावधान ! सेलू परिसरात महिलांची डिजिटल फसवणूक ; रिंग ॲपद्वारे लावला चुना

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**सेलू, दि. १२**

सेलू तालुक्यातील हिंगणी परिसरात ग्रामीण महिलांची डिजिटल पद्धतीने फसवणूक करणा-या चंद्रशेखर नानाजी चिकराम या भामटयाविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे, बचत गटाच्या नावाखाली महिलांना कर्जाचे आमिष दाखवून आर्थिक लूट केल्याचा प्रकार उघड झाला आहे.

आरोपीने महिलांना प्रत्येकी ५० हजार रुपये कर्ज देण्याचे आश्वासन देत ७०० रुपये प्रोसेसिंग फी उकळली, विश्वासाने महिलांच्या मोबाईलमध्ये रिंग ॲप डाऊनलोड करुन त्यांच्या नावे परस्पर कर्ज मंजूर करुन घेतले.

एका महिलेच्या खात्यात जमा झालेले २७, ७५२ रुपये माझेच आहेत, असे सांगून आरोपीने स्वत :च्या खात्यात वळवून घेतल्याचे समोर आले आहे. महिनाभरानंतर महिलांच्या मोबाईलवर कर्जाचे हप्ते भरण्याचे संदेश येऊ लागल्यानंतर फसवणूक झाल्याचे उघड झाले, संतप्त महिलांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात तक्रार दिली असून पुढील तपास सुरु आहे, मोबाईल, ओटीपी बँक तपशील किंवा कोणतीही वैयक्तिक माहिती अनोळखी व्यक्तीला देऊ नये तसेच संशयास्पद कर्ज ॲप्सपासून सावध रहावे, असे आवाहन पोलिस विभागाकडून करण्यात आले आहे.

# शेतातील तुरीचे गंजीला लावलेल्या आगीत २४०० पेट्या जळून खाक

### सेलू पोलिसांत तक्रार दाखल



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**सेलू ,दि.१२**

कोलगाव शिवारातील मयुर अनिल काळबांडे यांचे साडेतीन एकरातील तुरीचे गंजीला लावलेल्या आगीत २४०० पेट्या जळून खाक झाल्याने शेतकरयांचे २ लाख ४० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे ही घटना गुरुवारी ता १२ ला सकाळी उघडकीस आली याबाबत सेलू पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे

सेलू येथील प्रभाग क्रमांक १७ मधील रहिवासी मयुर काळबांडे यांचे मालकीची मौजा कोलगाव शिवारात शेती असून त्यांनी यात यावर्षीला सलग तुरीची लागवड केली होती या तुरीची कापणी झाल्यानंतर बुधवारी ता ११ ला तुरीची गंजी लावली होती याच रात्रीला कुणीतरी अज्ञात व्यक्तीने तुरीचे गंजीला लावलेल्या आगीत साडेतीन एकरातील २४०० पेट्या पुर्ण पणे जळून खाक झाल्या असून जवळच असलेल्या बंडीला या आगीची झळ पोहोचली .दुसरे दिवशी सकाळी त्यांना माहिती मिळताच शेताकडे धाव घेतली असता आगीत सर्व जळून खाक झाल्याने या शेतकऱ्याने सेलू पोलिसांकडे याबाबत तक्रार दाखल केली पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन घटनेचा पंचनामा केला याप्रकरणी ज्या लगतच्या शेतकऱ्याबाबत शेताचे रस्त्यावरून वाद आहे त्या तिघांचे हे कृत्य असल्याचा संशय या शेतकऱ्याने व्यक्त केला आहे.

या तिघांचा परिसरात अनेक शेतकऱ्यांना त्रास असल्याचे शेतकरी सांगत आहे याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंद केला असून अधिक तपास सुरू आहे.

## राष्ट्रासाठी मध्यस्थी २.० या विशेष मोहिमेचे आयोजन



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा,दि.१२**

न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांचा जलद निकाल, न्याय प्रक्रियेवरील ताण कमी करणे तसेच पक्षकारांना परस्पर समजुतीने न्याय मिळवून देण्यासाठी 'राष्ट्रासाठी मध्यस्थी २.०' ही विशेष मोहीम दिनांक २ जानेवारीपासून ९० दिवस वर्धा न्यायिक जिल्ह्यामध्ये राबविण्यात येत आहे. ज्या पक्षकारांचे प्रकरण प्रलंबित आहेत, त्यांनी या मोहिमेचा लाभ घेण्याचे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष हेमंत गायकवाड यांनी केले आहे.

'राष्ट्रासाठी मध्यस्थी-२.०' विशेष मोहिमेची संकल्पना राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व सर्वोच्च न्यायालयाच्या मध्यस्थी व सलोखा प्रकल्प समिती यांनी संयुक्तपणे केली आहे. भारताचे सरन्यायाधीश श्री. सुर्यकांत व राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यकारी अध्यक्ष व मध्यस्थी व सलोखा प्रकल्प समितीचे अध्यक्ष न्यायमुर्ती विक्रम नाथ यांच्या आदेशान्वये संपूर्ण भारतात तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यकारी अध्यक्ष न्यायमुर्ती रविंद्र घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात ही मोहीम राबविण्यात येत आहे. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष हेमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धा न्यायिक जिल्ह्यामध्ये राष्ट्रासाठी मध्यस्थी २.० ही विशेष मध्यस्थी मोहीम २ जानेवारीपासून प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या मोहिमेत न्यायालयात प्रलंबित असलेले वैवाहिक वाद, अपघात भरपाई प्रकरणे, कौटुंबिक हिंसाचार, धनादेश न भरण्याचे (चेक बॉउन्स), व्यावसायिक वाद, सेवा विषयक, तडजोड पात्र फौजदारी प्रकरणे, ग्राहक तक्रार मंचाकडील प्रकरणे, कर्ज वसूली प्रकरणे, जमीन, मालमत्ता वाटप प्रकरणे, घरमालक व भाडेकरु वाद प्रकरणे, जमीन संपादन तसेच इतर नागरी प्रकरणे मध्यस्थीसाठी ठेवले जावू शकतात. विशेष मध्यस्थी मोहीम दररोज पक्षकारांच्या सोयीप्रमाणे होणार असून ऑनलाईन, ऑफलाईन व हायब्रिड पध्दतीचा वापर करुन केली जाणार आहे. या मध्यस्थी प्रक्रियेमध्ये ४० तास प्रशिक्षण पूर्ण घेतलेले सर्व मध्यस्थ सहभागी होणार आहे, असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाव्दारे कळविण्यात आले आहे.

### पैशाच्या कारणावरुन युवकाला मारहाण

**वर्धा,:** मजुरीच्या पैशाच्या कारणातून प्रफुल्ल भलावी (२६) रा. गारपीट याला मारहाण करुन जखमी करण्यात आले, ही घटना तक्रारीनंतर १० फेब्रुवारी रोजी उघडकीस आली, प्रफुल्ल भलावी याला गावातील संजय राठोड याने तुझ्याकडे जुने पैसे असल्याने आता मजुरीचे येथे पैसे देत नाही, असे म्हटले या कारणातून दोघांत वाद झाला, दरम्यान, संजय राठोड याने प्रफुल्लला अमानुष मारहाण करुन जखमी केल्याचे तक्रारीत नमूद असल्याचे कारंजा पोलिसांनी सांगितले.

### किरकोळ वाद, महिलेस तिघांनी मारले

**समुद्रपूर, :** किरकोळ कारणातून झालेल्या वादात महिलेस तिघांनी मारुन जखमी केले.

माधुरी राजू धापटे आणि ममता प्रफुल्ल धापटे या शेजारी राहतात, त्यांच्यात सांडपाण्याच्या कारणातून वाद झाला, दरम्यान, ममता, ऋतुजा आणि सविता धापटे यांनी माधुरी सोबत वाद करत शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी मारले, तसेच तिला मारण्याची धमकी दिली, याप्रकरणी समुद्रपूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस करत आहेत.

### महिलेचा मानसिक छळ

**वर्धा :** महिलेचा मानसिक छळ करत तिला धमकी देऊन त्रास दिल्या प्रकरणात अनिल दुबे रा. बोरगाव मेघे यांच्याविरुद्ध शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे, बजरंग दल आणि दुर्गा वाहिनीने दुबे यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. वर्ध्यातील रहिवासी महिलेला अनिल दुबे हा काही काळापासून अनिल दुबे हा काही काळापासून सातत्याने मानसिक त्रास देत आहे, तसेच अपमानास्पद वागणूक देत आहे, तिला शिवीगाळ करणे धमकी देण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे, ११ रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास अनिल दुबे याने पीडित महिलेला धमकावून त्रास दिला, अखेर तिने डायल ११२ वर संपर्क साधला. पोलिस घटनास्थळी दाखल झाले.

## निधन वार्ता

### संतोष भालेराव

**सिंदी(रे),:** येथील बिनोबा वार्डातील रहिवासी संतोष भालेराव (५४)यांचे दीर्घ आजाराने निधन झाले.स्थानिक मोक्षधामात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.



### श्रीधर निनावे



**हिंगणघाट, :** मारोती वार्ड येथील रहिवासी श्रीधर बाजीराव निनावे(९४) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पाच मुले, स्नुषा, नातवंड असा परिवार आहे त्यांचे पार्थिवावर वणा नदी मोक्षधामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

### संजय आकरे

**वर्धा, :** हरिहरनगर अवधूतवाडी, आकरे ले-आउट येथील रहिवासी संजय विठ्ठल आकरे(५७) यांचे दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्यावर नागपूर येथील रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी भाऊ, बहिणी, जावई असा आप्तपरिवार आहे. वंजारी चौक येथील पंचशील हॉटेलचे संचालक बाबाराव आकरे यांचे ते लहान बंधू होत. त्यांची अंत्ययात्रा अवधूतवाडी येथील निवासस्थानावरून सकाळी ११ वाजता निघणार आहे.



### जिल्हा सामान्य रुग्णालयात युनानी दिन साजरा




■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. १२**

राष्ट्रीय आयुष अभियान अंतर्गत ११ फेब्रुवारी हा हकिम अजमल खान यांचा जन्म दिवस जागतिक युनानी दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालयात युनानी दिवस साजरा करण्यात आला.

यावर्षीच्या जागतिक युनानी दिनाची थीम 'युनानी पध्दतीमे नवाचार और साक्ष्य' अशी आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या आयुष विभागात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुमंत वाघ व आयुष अधिकारी संदीप नखाते यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आलेल्या युनानी दिन कार्यक्रम प्रसंगी हकिम अजमल खान यांच्या फोटोला अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कल्पना सुनतकरी यांनी हार अर्पण अभिवादन केले. यावेळी सामान्य रुग्णालयाच्या युनानी वैद्यकीय अधिकारी डॉ. रेहान खान, डॉ. शगुत्फा अहमद, डॉ. सिमा लोहकरे, डॉ.अश्विनी डोणे, डॉ. योगिता भेंडे, शंकर तायडे, मनिषा कलवडे, अरुणा भागवत, दिव्या कनेरी, प्रमादे इटनकर आदी उपस्थित होते. यावेळी डॉ. कल्पना सुनतकरी यांनी युनानी दिवसाचे महत्व सांगून युनानी चिकित्सा पध्दतीवर मार्गदर्शन केले. व युनानी पध्दतीचा लाभ घेण्याचे आवाहन केले.युनानी दिनानिमित्त उपजिल्हा रुग्णालय आर्वी, हिंगणघाट, ग्रामीण रुग्णालय, पुलगाव येथील आयुष विभागात देखील विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# सनशाईन स्कूल येथे केंद्रीय अर्थसंकल्पावर कार्यशाळा

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**कारंजा (घा), दि. १२**

कारंजा : सनशाईन स्कूल येथे केंद्रीय अर्थसंकल्प या विषयावर विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यशाळेचे संस्थाध्यक्ष तथा मुख्याध्यापक प्रेम महिले यांच्या संकल्पनेतून आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून अर्थविषयक अभ्यासक व प्रेरणादायी वक्ते येथील सनदी लेखापाल शुभमजी जयस्वाल उपस्थित होते.

प्रेम महिले यांनी आपल्या प्रास्ताविकात विद्यार्थ्यांना अर्थसंकल्पाची मूलभूत संकल्पना समजून घेणे किती आवश्यक आहे. शुभम जयस्वाल यांनी मार्गदर्शनात प्रमुख मुद्दे विद्यार्थ्यांना सोप्या व




समजण्यासारख्या भाषेत स्पष्ट केले. त्यांनी कररचना, शिक्षण व आरोग्य क्षेत्रासाठीची तरतूद, पायाभूत सुविधांवरील खर्च, डिजिटल व स्टार्टअप क्षेत्रातील संधी तसेच ग्रामीण विकासासाठीच्या योजनांचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांना त्यांनी 'बजेट म्हणजे फक्त आकडेवारी नसून देशाच्या विकासाचा आराखडा आहे' असे सांगत अर्थसंकल्पाचा दैनंदिन जीवनाशी असलेला संबंध स्पष्ट केला. कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून उत्सुकता व्यक्त केली. प्रश्नोत्तर सत्रात जयस्वाल यांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधानकारक निरसन केले. त्यामुळे कार्यक्रम अधिक संवादात्मक व ज्ञानवर्धक ठरला. विद्यार्थिनीने आभार मानले. अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय घडामोडींबाबत जागरूकता निर्माण होऊन त्यांची विचारशक्ती व विश्लेषण क्षमता विकसित होण्यास मदत होते.

## आदिवासी महिला सक्षमीकरण योजनेच्या नावावर फसवणूकीस बळी पडू नये

### आदिवासी विकास विभागाचे आवाहन

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. १२**

राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण योजनेंतर्गत आदिवासी लोकांकडून पैसे घेऊन अर्ज भरण्यात येत आहे, अशी तक्रार आदिवासी विकास विभाग कार्यालयास प्राप्त झाली आहे. त्यामध्ये योजनेचे नाव वापरुन गट व वैयक्तिक रित्या पैसे घेऊन आदिवासी जनतेची फसवणूक केली जात आहे. त्यामुळे अशा फसवणूकीला बळी पडू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण योजनेंतर्गत मंजूर यादीमध्ये समाविष्ट असलेल्या महिला लाभार्थ्यास १०० टक्के अनुदान देण्याची तरतूद आहे. त्यानुसार लाभार्थी निवड करुन निवड यादीमध्ये समाविष्ट महिला लाभार्थ्यांना १०० टक्के अनुदान दिले जाते. यासंबंधी बाहेरील व्यक्तीने पैशाची मागणी केली अथवा कुठलीही अडचण आल्यास थेट प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयास संपर्क साधावा. सदर प्रकरणाच्या विरोधात पोलिसांकडे तक्रार करुन प्रकल्प कार्यालयाद्वारे कार्यवाही करण्यात आली आहे, असे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी गितांजली निकम यांनी कळविले आहे.

# राष्ट्रीय लोकअदालत १४ मार्च रोजी

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि.१२**

जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये दि.१४ मार्च रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकअदालत मध्ये मोठ्या प्रमाणात प्रकरणे ठेवून निकाली काढावी, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश हेमंत गायकवाड तसेच जिल्हा न्यायाधीश-१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस.ए.एस.एम.अली यांनी केले आहे.

न्यायालयात तडजोड पात्र प्रलंबित प्रकरणे आपसी सामंजस्यातून तडजोडीद्वारे निकाली काढण्यासाठी लोक अदालत हे प्रभावी माध्यम ठरले आहे. यामुळे पक्षकारांना वेळ, खर्च आणि मानसिक त्रास टाळता येतो. दोन्ही पक्षकारातील संबंध सलोख्याचे राहतात. तसेच लोक अदालतीमुळे न्यायालयातील प्रलंबित खटल्यांची संख्या कमी करण्यामध्ये मोठ्या प्रमाणात यश प्राप्त झाले आहे.न्यायालयात दाखल असलेली सर्व तडजोड पात्र प्रलंबित प्रकरणे, दिवाणी दावे तसेच वाद दाखलपूर्व तडजोड पात्र प्रकरणे येत्या राष्ट्रीय लोकअदालतीत तडजोडीने निकाली काढण्यासाठी ठेवण्यात येणार आहे. जिल्हा मुख्यालयासह जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयामध्येही सकाळी १० वाजता लोक अदालतीचे आयोजन करण्यात येणार आहे.या लोक अदालतीमध्ये दिवाणी व तडजोड पात्र फौजदारी प्रकरणे, एनआय ॲक्टची प्रकरणे, भूसंपादन, कौटुंबिक, मोटार वाहन अपघात दावा, एमएसईबीची प्रकरणे, दरखास्त, ग्राहक तक्रार न्याय निवारण प्रकरणे, कामगार न्यायालयातील प्रकरणे, न्यायालयातील प्रलंबित बँकेशी संबंधित प्रकरणे तसेच वाद दाखलपूर्व प्रकरणांमध्ये टेलिफोन, मोबाईल कंपनी संबंधित, राष्ट्रीयकृत बँक, पतसंस्था, ग्रामपंचायत तसेच नगरपरिषद येथील पाणीपट्टीचे प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये ठेवण्यात येणार आहे.

लोक अदालतीत पक्षकारांना आपली बाजू मांडण्याची संधी मिळते तसेच दोन्ही पक्षकारांना मान्य असलेली तडजोड पक्षकारांच्या सहमतीने होते. राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये झालेल्या न्याय निवाड्याचे, तडजोडीचे समाधान दोन्ही पक्षकारांना होते. त्यामुळे राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये मोठ्या प्रमाणात तडजोडीसाठी प्रकरणे ठेवावीत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव विवेक देशमुख यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा व सत्र न्यायालयाच्या दुरध्वनी क्रमांकावर तसेच तालुका विधी सेवा समिती तथा दिवाणी व फौजदारी न्यायालय हिंगणघाट, पुलगाव, आर्वी, आष्टी, सेलू, समुद्रपूर व कारंजा येथे संपर्क साधावा, असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

### विद्युत प्रवाहाच्या धक्क्याने व्यक्तीचा मृत्यू

**समुद्रपूर, :** शेतात फार्म हाऊसच्या स्लॅबचे काम सुरु असताना मिस्त्रीला घराचे करुन गेलेल्या वीज प्रवाहित तारांचा सळाखीला स्पर्श झाल्याने अमोल महादेव भस्मे(वय ३८) यांचा मृत्यू झाला, तालुक्यातील कोरी (कानकाटी) येथील झिले यांच्या शेतात उघडकीस आली आहे.

कोरी (कानकाटी) शिवारात अशोक झिले यांच्या शेतात फॉर्म हाऊसचे बांधकाम सुरू आहे, घराचा स्लॅबच्या सळाखी अमोल भस्मे हा बांधत होते, घराला लागूनच ११ केव्हीच्या तारा गेल्या होत्या, त्या विज प्रवाहित तारांना सळाखीचा स्पर्श झाल्याने त्याला जबरदस्त विजेचा झटका बसला, त्यातच त्याचा मृत्यू झाला, घटनेची माहिती मिळताच समुद्रपूर पोलिस घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा करुन मृतदेह शवविच्छेदन साठी ग्रामीण रुग्णालय समुद्रपूर येथे रवाना केला, पुढील तपास समुद्रपूर ठाणेदार रवींद्र रेवतकर यांचे मार्गदर्शनात राहुल मानकर, प्रकाश मैद, चकोले करीत आहेत.

# मंगरूळ बिटात मृतावस्थेत आढळला बिबट्या; झुंजीत मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**समुद्रपूर, दि. १२**

तालुक्यातील मंगरूळ येथील राखीव वन कक्ष क्रमांक ३२७ मध्ये तिन ते साडेतीन वर्ष वयाचा एक मादी बिबट्या मृतावस्थेत आढळला. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. प्रारंभिक अंदाजानुसार, बिबट्याचा मृत्यू प्रादेशिक वाद (territorial fight) कारणीभूत ठरला असावा, असे सांगितले जात आहे.

१० फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास वनरक्षक गस्त घेत असताना त्यांना बिबट्याचं मृत शरीर आढळलं. घटनेची माहिती मिळताच उपवनसंरक्षक हरविर सिंग, सहायक वनसंरक्षक हरीष सरोदे, मानद वन्यजीव रक्षक कौशल्य मिश्रा, NTCA चे आशीष गोस्वामी आणि NGO 'पिपल फॉर ॲनिमल' च्या प्रतिनिधी कौस्तुभ गावंडे घटनास्थळी पोहोचले.

सर्व वन अधिकारी आणि पशुवैद्यकीय डॉक्टरांच्या उपस्थितीत बिबट्याचं शवविच्छेदन करण्यात आले. डॉक्टर डॉ. डि.के. बारापात्रे, डॉ. ज्योती चव्हान आणि डॉ. अरुण तुराळे यांनी शवविच्छेदन प्रक्रियेची देखरेख केली. बिबट्याचं अंदाजे वय तीन ते साडेतीन वर्षे असून, तो मादी होता, असं तज्ज्ञांनी सांगितले.

शवविच्छेदनानंतर बिबट्याचं अंतिम संस्कार NTCA च्या मार्गदर्शक तत्वानुसार पूर्ण करण्यात आले. या सर्व कार्यवाहीत वनपरिक्षेत्र अधिकारी वैशाली भलावी, वनपाल डेहनकर, वनरक्षक चौखे यांच्यासह वर्धा येथील उपवनसंरक्षक श्री. हरविरसिंग आणि सहायक वनसंरक्षक श्री. सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यवाही केली गेली.

